**स.फौ.के. नं. १००/२०२४**

**नि. क्र. ०७ लगत**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०३ चा जबाब शपथेवर सुरु</u>.**

**नाव** – सचिन गोविंद लगारे,

**वय** – ३१ वर्षे, **व्यवसाय** – नोकरी (पोलीस शिपाई ब. क्र. ९५),

**सध्या नेमणूक** – पोलीस ठाणे देवरुख, जि. रत्नागिरी.

**<u>अभियोगपक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून</u>–**

**०१**. दिनांक २०/०३/२०२४ रोजी मी पोलीस ठाणे देवरुख येथे पोलीस शिपाई या पदावर कार्यरत होतो. त्यादिवशी मला कोल्हापुर येथे टपाल देण्याकरीता नेमण्यात आले होते. अपराध क्र. २८/२०२४, महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५– ब,क,ड,फ,ई मधील जप्त केलेल्या गावठी हातभट्टी, गुळ व नवसागर मिश्रीत कुजके रसायन व गुळ व नवसागर मिश्रीत उकळते रसायन यांच्या प्रत्येक १८० मिलीच्या एकुण ०३ काचेच्या नमुना मुद्देमालाच्या बाटल्या कोल्हापूर येथील न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेत जमा करण्याचे कर्तव्य मला नेमण्यात आले होते. मी तो मुद्देमाल मुद्देमाल कारकूनाकडून ताब्यात घेतला होता. मुद्देमाल कारकुनाने त्याच्या सिलबंद बाटल्या व त्यासोबत एक पत्र दोन प्रतीत मला दिले होते.

**०२**. नमूना मुद्देमाल व दोन प्रतीतील सदरचे पत्र ताब्यात घेवून देवरुख येथून कोल्हापूर येथील त्या प्रयोगशाळेत मी गेलो. तेथे मी तो नमुना मुद्देमाल व पत्र दिनांक २०/०३/२०२४ रोजी जमा करुन एका प्रतीवर तेथील लिपीकाची स्वाक्षरी व शिक्का घेतले. ती प्रत तपासीक अधिकारी यांच्याकडे मी दिली. मला आता दाखविण्यात आलेली प्रत तीच आहे. त्यावर न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळा लिपीक, कोल्हापुर यांची सही व तपासीक अधिकारी व पोलिस निरीक्षक, पोलीस ठाणे देवरुख यांची सही आहे आहे. (*सदर दस्तास* ***<u>निशाणी क्रमांक १९</u>*** *देण्यात आली*).

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास – आरोपीतर्फे विधीज्ञ श्रीमती एस. ए. गिडये यांच्याकडुन–**

**०३.** हे म्हणणे खरे आहे की, नमुना मुद्देमाल पोलीस ठाण्यातून कोल्हापूर येथे जमा करुन पुन्हा परत आलेला कोणताही कागदोपत्री पुरावा मी तपासीक अधिकारी यांच्याकडे दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी नमूद दिवशी नमूना मुद्देमाल व दोन प्रतीतील पत्र घेवुन गेल्याचे व तेथे जमा केलेचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकूर खोटा नमूद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.08.05 18:24:17 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दिनांक –०५.०८.२०२६

न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,
जि. रत्नागिरी.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | A. A. Shivalkar. |
| Court name | : | Civil Judge, J. D. and J.M.F.C., Deorukh. |
| Date | : | 05/08/2026 |
| Evidence signed by the presiding officer on | : | 05/08/2026 |
| Evidence uploaded on | : | 05/08/2026 |